वसई विरार शहर महानगरपालिका

# ई-वार्ता

माहे एप्रिल 2016

## स्वच्छतेसाठी जनजागृती अभियान

केंद्र शासन व महाराष्ट्र शासनातर्फे स्वच्छ भारत अभियान राबविले जात आहे. या अभियाना अंतर्गत विविध उपक्रम (Thematic Drives) यशस्वीरित्या राबविण्यात आले आहेत. त्याचाच एक भाग म्हणून केंद्र शासनाने सुधारित कार्यक्रम दि. 4 एप्रिल ते 19 एप्रिल पर्यंत जाहिर केला होता. या कार्यक्रमा अंतर्गत उघड्यावर शौचास जाणारी ठिकाणे निवडून प्रत्येक ठिकाणासाठी स्वच्छता निरीक्षक, बांधकाम अभियंता, महानगरपालिका कर्मचारी इत्यादी यांचे गट तयार केले. त्यानुसार वसई–विरार शहर महानगरपालिकेने उघड्यावर शौचास जाणारी 38









ठिकाणांची निवड करून प्रत्येक ठिकाणांसाठी 1 गट असे 38 गट तयार केले. या गटांमध्ये त्या त्या विभागातील अंगणवाडी सेविका व महिला बचत गट यांचा स्वच्छता दूत म्हणून समावेश करण्यात आला होता. या गटांमार्फत उघड्यावर शौचास जाणा–या ठिकाणांना भेट देऊन तेथील परिसराची पाहणी केली, लोकांमध्ये जागरूकता निर्माण करणे व उघड्यावर शौचास जाण्यामुळे होणारे दुष्परिणाम समजवून त्यांना उघड्यावर शौचास जाण्यास परावृत्त करणे इत्यादी कामे शासनाने दिलेल्या कृती वेळापत्रकानुसार दि. 4 एप्रिल ते 19 एप्रिल या दरम्यान केली गेली.

वसई विरार शहर महानगरपालिका

# ई - वार्ता

माहे एप्रिल 2016

## बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त १ एप्रिल ते १५ एप्रिल २०१६ रोजी दरम्यान झोपडपट्टी वसाहती मध्ये वसई– विरार महानगरपालिकेची विशेष स्वच्छता मोहीम.



स्वच्छ भारत अभियाना अंतर्गत वसई–विरार महानगरपालिकेद्वारे विविध स्वच्छता कार्यक्रम व योजना यशस्वीरित्या पार पाडल्या जात आहेत. केंद्र शासन व महाराष्ट्र शासनातर्फे दि. १ एप्रिल २०१६ ते ३१ मार्च २०१७ दरम्यान विशेष स्वच्छता मोहीम प्रसिद्ध करण्यात आले आहे या मोहिमेचे भाग म्हणून दि. १ एप्रिल ते १५ एप्रिल २०१६ कालावधीत मनपा हद्दीत येणाऱ्या सर्व झोपडपट्टी भागात महानगरपालिकेद्वारे विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. यामध्ये झोपडपट्टी भागातील नाल्यांची तसेच रस्त्यांची सफाई करण्यात आली. तसेच उघड्यावर शौचास जाणे थांबविण्यासाठी नागरिकांना स्वच्छ भारत अभियानाअंतर्गत वैयक्तिक शौचालये बांधून दिले असून त्यांचे वापर सुद्धा सुरु झालेला आहे.

वसई विरार शहर महानगरपालिका

# ई - वार्ता

माहे एप्रिल 2016

## दि. १६ एप्रिल ते ३० एप्रिल दरम्यान शालेय विद्यार्थ्यांच्या मदतीने ऐतिहासिक स्थळे व स्मारकांच्या परिसरात स्वच्छता मोहीम.

स्वच्छ भारत अभियानांतर्गत वसई–विरार शहर महानगरपालिकेद्वारे विविध स्वच्छता कार्यक्रम व योजना यशस्वीरीत्या पार पाडल्या जात आहेत. केंद्र शासन व स्वच्छ भारत अभियानातर्फे दि. १ एप्रिल २०१६ ते ३१ मार्च २०१७ दरम्यान दर पंधरवड्यास विषयागणिक विशेष स्वच्छता मोहीम राबविणेबाबत कार्यक्रम जाहीर करणेत आला आहे.





या मोहिमेचा भाग म्हणून दि. १६ एप्रिल ते ३० एप्रिल दरम्यान स्वच्छ भारत अभियाना अंतर्गत वसई विरार शहर महानगरपालिकेद्वारे मनपाच्या कार्यक्षेत्रातील विविध ऐतिहासिक स्थळे व स्मारकांच्या परिसरात विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. या कार्यक्रमात त्या त्या परिसरात असलेल्या शालेय विद्यार्थांना सहभागी करण्यात आले. या मोहिमेअंतर्गत नालासोपारा प्रभागातील बौधस्तूप, वसई किल्ला ई. ऐतिहासिक स्थळांचे व राजोडी, पाचूबंदर, सुरुची बाग ई. समुद्र किनारे स्थळांचे परिसर स्वच्छ करण्यात आले.

वसई विरार शहर महानगरपालिका

# ई-वार्ता

माहे एप्रिल 2016

## "स्वच्छ भारत मिशन पंधरवडा साजरा"





वसई–विरार शहर महानगरपालिका राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान अंतर्गत स्वच्छ भारत मिशन पंधरवडा दि. 01/04/2016 ते 15/04/2016 या कालावधीत राबविण्यात आला. या पंधरवडयात बचत गटांच्या महीलांनी उत्स्फुर्तपणे सहभाग घेतला. त्यामध्ये त्यांची त्यांच्या वाडी, वस्ती, परीसर पूर्णपणे स्वच्छ व सुंदर केला. तसेच त्यांनी इतरांना स्वच्छता बाळगण्याचा संदेश दिला.
या पंधरवडयात 229 महिलांना स्वच्छतापर गिते, खेळ, स्वच्छता फलक, स्वच्छतेचे साहित्याचे वाटप अभियानाच्या शहर व्यवस्थापक सौ विभा जाधव (SMID) यांच्या हस्ते करण्यात आले.

तसेच त्यांनी महानगरपालिके अंतर्गत असलेले सर्व बचत गटात स्वच्छतेची शपथ दिली.
या प्रमाणे हा स्वच्छतेचा पंधरवडा वसई, बोळिंज, मनवेलपाडा, नालासोपारा, विरार या भागात राबविण्यात आला.

वसई विरार शहर महानगरपालिका

# ई-वार्ता

माहे एप्रिल 2016

## वसई विरार शहर महानगरपालिकेत सुरू झाले बायोमेट्रिक अटेंडन्स सिस्टम




वसई विरार शहर महानगरपालिकेत 1 एप्रिल पासून महानगरपालिकेच्या 9 प्रभाग समिती कार्यालयामध्ये तसेच डी. एम. पेटीट (रूग्णालय), तुळींज(रूग्णालय), बरामपूर(ओ.पी.डी), नवघर–माणिकपूर(ओ.पी.डी), रामदास नगर(ओ.पी.डी), ओम नगर (ओ.पी.डी), माणिकपूर(ओ.पी.डी), मनवेलपाडा(ओ.पी.डी),धानीव–पेल्हार (ओ.पी.डी), दिवाणमान(ओ.पी.डी), वटार(ओ.पी.डी), कोफराड(ओ.पी.डी), उमराळे–करमाळे(ओ.पी.डी), आगाशी(ओ.पी.डी), चिखलडोंगरी(ओ.पी.डी), बिलालपाडा(ओ.पी.डी), गालानगर(ओ.पी.डी), आचोळे(ओ.पी.डी), काशीद–कोपर(ओ.पी.डी), गोखीवरे, सातिवलीबायोमेट्रिक अटेंडन्स सिस्टम लावण्यात आल्या. यानुसार महानगरपालिका कार्यालयात कार्यरत असलेल्या सर्व कायम कर्मचा–यांची हजेरी ही बायोमेट्रिक अटेंडन्स पद्धतीने होत आहे. लवकरच कंत्राटी तसेच सफाई कर्मचा–यांची हजेरी सुद्धा बायोमेट्रिक पद्धतीने होणार आहे. यासाठी वसई विरार शहर महानगरपालिका महत्वाचे पाऊल घेत आहे.

वसई विरार शहर महानगरपालिका

# ई-वार्ता

माहे एप्रिल 2016

## प्रभाग समिती–एफ अंतर्गत अनधिकृत बांधकाम निष्कासित









वसई-विरार शहर महानगरपालिका भाग समिती (एफ) धानिव/पेल्हार हद्दीतील दि. ०१/०४/२०१६ ते दि. २१/०४/२०१६ पर्यंत ३७ रुम, २५४ रुम पायाचे, ४ गाळे,५ गोदामचे R.C.C G + 2, व R.C.C G + 3 इमारतीच्या स्लॅबचे अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्यात आले.